# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०१/२०१७

**१) मोटार सायकल स्लीप होवुन महीलेस जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १३/०१/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादीस यातील आरोपी चालकाने मोटार सायकलवर मागे बसवुन घरी सोडण्यास जात असतांना आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व लापरवहीने चालवुन मोटार सायकल स्लीप होवुन खाली पडुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी श्रीमती भिमाबाई एकनाथ भोवते वय ५१ वर्ष, रा. शहापुर यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरगर येथे कलम २७९३३७ भादवी. सहकलम १८४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**२)गळफास लावुन इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक १२/०१/२०१७ रोजी २१.३० ते १३/०१/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील मृतक अश्विन रामप्रसाद मेश्राम वय २२ वर्ष, रा. रुपेरा हा दि. १२/०१/२०१७ चे रात्री २१.३० वा. घरी जेवन करुन घरी कुणाला काहीही न सांगता निघुन गेला व दुस—या दिवशी १३/०१/०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादीस गावातील टोकीराम ठाकरे यांनी एका इसमाने रुपेरा शिवारातील दावेझारी रोडचे बाजुला हिवराचे झाडाला नायलॉन दोरीने गळफास लावले आहे. अशी माहीती प्राप्त होताच फिर्यादीने त्याठिकाणी जावुन पाहीले असता मृतक हा गळफास लावुन मरण पावल्याचे दिसुन आल्याने फिर्यादी रामप्रसाद रतीराम मेश्राम वय ५० वर्ष, रा. रुपेरा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे मर्ग क्र. कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो. स्टे. सिहोरा हे करीत आहे.

**३) फुटबॉल खेळत असतांना भिंतीवरुन खाली पडल्याने उपचारा दरम्यान बालकाचा मृत्यु . :—**

दिंनाक ०५/०१/२०१७ रोजी १२.०० वा. दर. यातील मृतक रोहीत हरीप्रसाद कटौते वय १० वर्ष, रा. डोंगरी बुज. हा दि. ५/०१/२०१७ चे १२.०० वा. दर. मुलासोबत फुटबॉल खेळत असतांना उंच भिंतीवरुन खाली पडुन त्याचे पाठीला मार लागल्याने त्यास दि. ६/०१/२०१७ रोजी डोंगरी/बुज येथिल सरकारी दवाखान्यात भरती केले असता प्राथमीक उपचार करुन तेथील डॉक्टरांनी रेफर केल्याने त्यास दि. ६/१/२०१७ चे ०९.४५ वा. दर. केअर हॉस्पीटल रामदास पेट नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान ७/१/२०१७ चे ०१.०० वा. दर. मरण पावल्याने पोस्टे सिताबर्डी नागपुर येथे ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाव्दारे प्राप्त झाल्याने पोस्टे गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो. स्टे. गोबरवाही हे करीत आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १३/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १४५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, अवैध प्रवासी वाहनावरती ०३ तिन सिटर वाहनांवरती ३४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०८ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.